||संस्कृती रक्षतिः स्त्री शक्तिः||

भगिनी मंडळ चोपडा संचलित

# समाजकार्य महाविद्यालय चोपडा, जि.जळगांव

भगिनी मंडळ,
चोपडा, जि. जळगांव

**स्थापना वर्ष-१९९४**

*विद्यार्थीनी व्यक्तीमत्व विकास योजना*

*अंतर्गत कार्यशाळा*

## युवती सभा कार्यक्रम /अहवाल

**दिनांक-03 फेबुवारी २०१८**

**प्रा.संबोधी एम.देशपांडे,** (युवती सभा प्रमुख)

Sundhargadhi, Chunchale Road,
Tal-Chopda, Dist-Jalgaon
**Phone No.02586-223017**

महाराष्ट्र शासन अनुदानित व उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगांव संलग्नीत
भगिनी मंडळ चोपडा संचलित,

# समाजकार्य महाविद्यालय चोपडा जि.जळगांव

महाराष्ट्र शासन मान्यता पत्र क्र.
CSW.1094/12355/F.N.107/Sudhar,1 Dt.30/6/1994
विद्यापीठ मान्यता पत्र क्र.
NMU/94/5/J-48/6152 Date:-13/9/1994

Dr.Ishwar M. Saundankar
Principal
Phone No.02586-223017
Fax No. 02586 -223017, 220533

भगिनी मंडळ, चोपडा, जि. जळगांव
'B' Grade NAAC Accredited (2.66)

Mrs.Poonam Ashish Gujarathi
President
Post Box No.20, Chopda
Phone No.02586-220015

जा.क्रं.- भमसकाम/ 368 /2017-18

दिनांक - 26/4/2018

प्रति,

मा.संचालक सो.

विद्यार्थी विकास विभाग

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,

जळगाव

**विषयः-युवती सभेचा-२०१७-१८ अहवाल व हिशेब पत्रक स्विकारणेबाब...**

महोदय,

उपरोक्त विषयान्वये विनंती की, भगिनी मंडळ चोपडा संचलित, समाजकार्य महाविद्यालय चोपडा, जि.जळगांव येथे युवती सभा अंतर्गत विद्यार्थीनीची कार्यशाळा दि.०३ फेब्रुवारी, २०१८ या दिवशी संपन्न झाली. सदर युवती सभेचा अहवाल कार्यक्रमाचे फोटोसह पाठवित आहोत. तसेच कार्यक्रमाचे खर्चाचे हिशोब पत्र पाठवित आहोत.

कृपया स्विकार व्हावा ही विनंती.

स्नेहादराने,

आपला विश्वासू,

(डॉ.ईश्वर मा.सौंदाणकर)
प्राचार्य,
भगिनी मंडळ चोपडा संचलित,
समाजकार्य महाविद्यालय चोपडा,
जि.जळगांव

सोबतः- १) अहवाल
२) खर्चाचे व्हावचर्स

# युवती सभा अंतर्गत विद्यार्थीनी व्यक्तिमत्व विकास योजने अंतर्गत कार्यशाळेचा अहवाल

B.C.'s College of Social Work, Chopda IQAC

**दि. ०३ फेबुवारी २०१८**

भगिनी मंडळ चोपडा संचलित समाजकार्य महाविद्यालयामध्ये युवती सभे अंतर्गत व्यक्तिमत्व विकासासाठी दि.03 फेबुवारी 2018 रोजी कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळे -मधून महाविद्यालयातील युवतींना विविध विषयांवरील ज्ञान मिळावे आणि या ज्ञानाचा उपयोग त्यांनी प्रत्यक्ष जीवनात कायम स्वतःचा सर्वागिण विकास करावा हा या कार्यशाळेचा हेतू होता. या कार्यशाळेमध्ये महात्मा गांधी संचलित कला,शास्त्र व वाणिज्य महाविद्यालय, पंकज महाविद्यालय, नर्सिंग स्कुल ऑफ चोपडा, आणि समाजकार्य महाविद्यालयातील एकूण 127 विद्यार्थीनी सहभागी झाल्या होत्या.

युवती सभेअंतर्गत व्यक्तीमत्व विकास कार्यशाळेचे उद्‌घाटन भगिनी मंडळाच्या अध्यक्षा मा. सौ.पुनमताई गुजराथी या कार्यक्रमांचे उदघाटक मा. डॉ.आर.सी.गुजराथी चोपडा कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी मा.छायाबेन गूजराथी (उपाध्यक्षा, भगिनी मंडळ चोपडा)आणि मा.अश्विनीताई गुजराथी (सहसचिव, भगिनी मंडळ चोपडा) मा.डॉ.ईश्वर सौंदाणकर (प्राचार्य, समाजकार्य महाविदयालय) तसेच प्रा.आशिष गूजराथी (रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी ) प्रा.डॉ.विनोद रायपूरे (H.O.D.समाजकार्य महाविदयालय)प्रा.डॉ.मारोती गाचकवाड ( विदयार्थी विकास अधिकारी )प्रा. डॉ. संबोधी देशपांडे ( युवती सभा प्रमुख )यांच्या हस्ते करण्यात आले. प्रथम राष्ट्रमाता सावित्रिबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला. त्यानंतर दिपप्रज्वलनाने कार्यक्रमाचे उद्‌घाटन करण्यात आले.

यानंतर विद्यार्थीनींनी स्वागत गीत व ईशस्तवन सादर केले. सदर कार्यशाळेचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्रा.डॉ.मारोती गायकवाड (विदयार्थी विकास अधिकारी ) यांनी केले. याप्रसंगी त्यांनी या कार्यशाळेचा हेतू स्पष्ट केला. युवतींनी आपल्या जीवनामध्ये अधिक सक्षम करण्यासाठी व विविध विषयांवरील ज्ञान घेण्याकरीता सदर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामध्ये युवतींचे आरोग्य महिला सक्षमीकरण कायदा व समाज रचना, रोजगार व स्वयंरोजगार व युवतीच्या संधी, आजची युवती व आजचे शिक्षण तसेच पर्यावरण आजच्या काळाची गरज या सर्व विषयावर युवतीची चर्चा करुन

या चर्चेचा उपयोग आपल्या प्रत्यक्ष जीवनामध्ये करावा अशी अपेक्षा त्यांनी या प्रसंगी व्यक्त केली.

यानंतर कार्यशाळेचे प्रमुख उद्घाटक मा.डॉ.आर.सी.गुजराथी (चोपडा)यांनी आपल्या व्याख्यानात युवतीचे आरोग्य या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले. यामध्ये त्यांनी युवतीची दिनचर्या स्पष्ट केली. त्यात विदयार्थीनीनी सकाळी नाष्टा करुन कॉलेजात यावे. तसेच त्यांनी व्यायाम व योगासने करावीत. यामुळे दिवसाची सुरुवात चांगली होते. तसेच आहार आणि विहाराचे महत्वही त्यानी आपल्या व्याख्यानातून विदयार्थीनीना समजावून सांगितले, तसेच विदयार्थीनीनी विचारलेल्या प्रश्नावरही चर्चा करुन त्यामधून आपल्या आरोग्याची काळजी आपण कशी घ्यावी? यावर त्यांनी विदयार्थीनीना मार्गदर्शन केले.

यांनंतर कार्यशाळेचे उदघाटन कार्यक्रमातील अध्यक्षीय भाषणामध्ये भगिनी मंडळ संस्थेच्या अध्यक्षा सौ.पुनमताई गुजराथी यांनी सदर कार्यशाळा ही विदयार्थीनीच्या व्यक्तिमत्व विकासाकरिता अतिशय उत्तम आहे.

या कार्यशाळेतील व्याख्यानाचा उपयोग युवतींमधील आत्मविश्वास वाढविण्यासाठी होईल, अशी आशा त्यानी व्यक्त केली. सदर कार्यशाळेच्या उदघाटन कार्यक्रमांचे सुत्रसंचालन प्रा.डॉ.संबोधी देशपांडे (युवती सभा प्रमुख )यांनी केले, तसेच आभार प्रदर्शन प्रा.डॉ.राहुल निकम योनी केले.

यानंतर दुस-या सत्रामध्ये प्रा.विशाल हौसे (कला,शास्त्र व वाणिज्य महाविदयालय चोपडा)यांनी आर्थिक स्थिरतेतुन महिला सक्षमीकरण या विषयावर युवतीना मार्गदर्शन केले त्यामध्ये महिला सक्षम कश्या होतील? स्वावलंबी कश्या बनतील? स्वतःचे निर्णय स्वतः कश्या घेवू शकतील? यावर उदाहरणे देवून युवतीना मागदर्शन केले. तसेच युवतीनी विचारलेल्या प्रश्नाची उत्तरेही देण्यात आली. यानंतर दुफारचे भोजन करण्यात आले.

यांनतर मा.लक्ष्मीताई नारखेडे ( दिपक इडस्ट्रीज जळगांव ) यांनी रोजगार व स्वयंरोजगार व युवतीच्या संधी या विषयावर विदयार्थीनीना मार्गदर्शन केले त्यामध्ये त्यांनी युवतीना छोटे छोटे गृहउदयोग आपण कसे करु शकतो तसेच स्वतः उदयोग उभे करतांना कोणत्या अडचणी येतात याविषयी स्वअनुभव विदयार्थीनीना सांगितले तसेच

आयुष्यात अनेक सुख दुःखाचे टप्पे येतात पण ते टप्पे पार करुन आपण आपले स्वतःचे आयुष्य स्वावजंबनाने कसे जगू शकतो या विषयी त्यानी विदयार्थीनीना मागदर्शन केले.

यानंतर मा.प्रा.डॉ.शिल्पा बेंडाळे (प्राचार्य, आय.एम.आर.कॉलेज जळगांव)यांनी आजची युवती आजचे शिक्षण या विषयावर विदयार्थीनीना मार्गदर्शन केले. त्यामध्ये आजच्या शिक्षणातून चांगला माणूसही आपण घडणे असणे आवश्यक असल्याचे सांगितले तसेच युवतीना आपले करिअल आणि घरांची जवाबदारी याचीही काळजी युवतीनी घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच आपले शिक्षणाने आपण सुसंस्कृत व चांगले आयुष्‍ जगले पाहिजे असे त्यांनी विदयार्थीनीना मार्गदर्शन केले तसेचउ प्रा.तनुजा फेगडे (आय.एम.आय.कॉलेज जळगांव)यांनीही विदयार्थीनीना आपले शिक्षण घेत असतांना आपल्यातील कला गुणानाही वाव मिळेल याकरिता प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे सांगितले.

यानंतर पर्यावरण आजच्या काळाची गरज या विषयावर प्रा.डॉ.निलम पाटील यांनी विदयार्थीनीना मागदर्शन केले यामध्ये पर्यावरण व मानव यातील यांतील संबंध त्यानी विषद केला तसेच पर्यावरणामधील वृक्षतोडीमुळे होणारे नुकसान याविषयी याविषयी त्यांनी विदयार्थीनीची त्यानी चर्चा केली. तसेच मानवाला आपले अस्तित्व राखण्यासाठी आजच्या काळामध्ये पर्यावरणाची कशी आवश्यकता आहे या विषयी त्यांनी मार्गदर्शन केले तसेच युवती व महिला ही अधिक जागृतीने पर्यावरणाची कशी काळजी घेवू शकतात याविषयी त्यानी युवतीना माहिती दिली.

यानंतर या कार्यशाळेचा समारोप भगिनी मंडळ संस्थेच्या अध्यक्षा मा.पुनमताई गुजराथी याचा मार्गदर्शनाने करण्यात आला यावेळी महाविदयालयाचे प्राचार्य डॉ.ईश्वर सौदाणकर,प्रा.डॉ.निलम पाटील ,मा.लक्ष्मीताई नारखेडे ,प्रा.कल्पना सोनवणे,मा.रुपाली देसाई,प्रा.डॉ.मारोती गायकवाड,प्रा.डॉ.संबोधी देशपांडे हे उपस्थित होते यावेळी सदर कार्यशाळेत दोन विदयार्थीनीनी आपले मनोगत व्यक्त केले त्यामध्ये त्यांनी सांगितले कि, आम्हाला या कार्यशाळेच्या माध्यमातून .चर्चा करण्यासाठी खुले व्यासपिठ मिळाले तसेच युवतीचे आरोग्य आजचे शिक्षण पर्यावरण इ.व्याख्यानातून चांगली माहिती मिळाली याचा उपयोग आम्हाला भविष्यामध्ये निश्चित चांगला होईल असे मनोगत त्यांनी व्यक्त केले.

या कार्यशाळेचा समारोप करतांना मा.पुनमताई गुजराथी (अध्यक्षा भ्रगिनी मंडळ ) यांनी सांगितले की, युवतीसभेच्या माध्यमातून व्यक्तिमत्व विकास कार्यशाळेचा समारोप करीत असतांना उत्तर महाराष्ट्र विदयापिठाने युवतीसभा हे व्यासपिठ विदयार्थीनीना आपले मत मांडण्यासाठी उपलब्ध करुन दिले याबाबत अभिनंदन केले तसेच विदयार्थीनीना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छ दिल्या .

सदर समारोप कार्यक्रमांचे आभार प्रा.संबोधी देशपांडे (युवती सभा प्रमुख )यांनी मानले.

Principal
Bhagini Mandal Chopda Sanchalit
College of Social Work,Chopda

BMS's, College of Social Work, Chopda
IQAC